दुरध्वनी क्र.२८१९३०८७,
अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना)
यांचे कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका,
भाईंदर (प.), ता.जि.ठाणे ४०११०१.
जा.क्र.माअधि/अपिल/९३/२०१८
दि.१३/०७/२०१८.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना), मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) अंतर्गत दाखल झालेले प्रथम अपील.**

................अपिलार्थी

श्री.सोहेल मु. खान,
बी/४०६, विणा सोसायटी, टेंबा रोड,
भाईंदर (प.) ४०११०१.

................प्रतिवाद

जनमाहिती अधिकारी तथा,
आस्थापना अधिक्षक (आस्थापना)

## -: विवेचन :-

श्री.सोहेल मु. खान यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) यांचेकडे दि.०४/०५/२०१८ रोजीच्या अर्जान्वये खालील माहिती मिळणेबाबत अर्ज सादर केला.

**विषय:- श्री.नितीन मुकणे, उप-अभियंता सद्यस्थितीत कार्यरत असल्याचे ठिकाण, सार्वजनिक बांधकाम विभाग, यांचे सेवा विषयक.**

अ) वरील नमुद अधिकारी सेवेत नेमणूक झाल्याचे दिनांक याबाबत माहिती मिळावी.
ब) त्या कालावधीच्या सेवायोजन कार्यालयाची यादीबाबत माहिती मिळावी.
क) नमुद अधिकारी सेवेत नेमणूक झाल्याचे वय याबाबत माहिती मिळावी.
ड) नमुद अधिकारी यांच्या मुलाखत दिनांक याबाबत माहिती मिळावी.
य) नमुद अधिकारी यांच्या अर्हता प्रमाणपत्र याबाबत माहिती मिळावी.

**अपिल दाखल करण्याची कारणे:-**
माहिती अधिकार अंतर्गत माहिती दिली नसल्याने अपिलार्थी अर्जदार यांनी दि.०४/०७/२०१८ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना) यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले.

**सुनावणीचा तपशिल:-**
अपिलार्थी अर्जदार व जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) यांना प्रथम अपिलाच्या सुनावणीस दि.१३/०७/२०१८ रोजी दुपारी १२.०० वाजता उपस्थित राहण्याबाबत जा.क्र.मिभामनपा/ उपआ.सा.प्र./३१८/२०१८ दि.०७/०७/२०१८ अन्वये कळविण्यात आले आहे.

सबब, जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) यांचेकडे प्रभाग क्र.2 चा अतिरिक्त कार्यभार दिला असल्यामुळे सदर सुनावणीस जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) अनुपस्थित असुन सुनावणीस सहा.जनमाहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपिक (आस्थापना) व अपिलार्थी अर्जदार सुनावणीस उपस्थित आहेत.

१) **अपिलार्थी यांचा सुनावणी दरम्यान युक्तिवाद**:- जा.क्र.मनपा/आस्था/मा.अ./१७०/२०१८ दि.११/०५/२०१८ रोजीचे पत्र टपालाद्वारे मला दि.३१/०५/२०१८ रोजी प्राप्त झाला आहे. नमुद पत्र अनुषंगाने संबंधित जनमाहिती अधिकारी यांनी आकारलेल्या शुल्काचा रक्कम रु.२०/- इतकी रोख रक्कम मनपा आस्थापना विभाग येथे पा.क्र.४३६१०, पा.नं.४३८ दि.०६/०६/२०१८ रोजी मी भरणा करुन संबंधित जनमाहिती अधिकारी यांना प्रत्यक्ष कार्यालयात भेट घेऊन नमुद माहितीच्या मुळ कागदपत्रांच्या निरिक्षण करण्याची संधी देऊन मला नियमानुसार प्रतची माहिती उपलब्ध करण्याबाबत कळविलेले होते. आज अखेर पर्यंत मला कोणत्याही स्वरुपातील माहिती उपलब्ध करुन देणेत आलेली नाही.

२) **सहा.जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान केलेला युक्तिवाद:-** अपिलार्थी अर्जदारास दि.११/०५/२०१८ रोजीच्या पत्रान्वये शुल्क भरुन सदर शुल्काची भरणा पावती सादर करुन माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल असे कळविण्यात आले होते. त्यानुसार दि.०६/०६/२०१८ रोजी पावती क्र.४३६१० नुसार रक्कम रु.२०/- इतकी रक्कम अपिलार्थी अर्जदाराने भरणा करुन अपिलार्थी अर्जदारास उपलब्ध माहिती दिली असता सदर माहिती मुळ कागदपत्रे पडताळणी करुनच मी माहिती स्विकारेन असे अपिलार्थी अर्जदाराने सांगितले. त्यामुळे अपिलार्थी अर्जदाराने माहिती स्विकारण्यास नकार दिला.

तदनंतर जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक यांनी स्पीड पोष्टद्वारे दि.११/०६/२०१८ रोजी अपिलार्थी अर्जदारास माहिती पाठविली असता सदरची माहिती पुनश्च: आस्थापना विभागात परत आली आहे.

दि.१५/०६/२०१८ रोजी अपिलार्थी अर्जदार हे जनमाहिती अधिकारी यांना प्रत्यक्ष येऊन भेटून अपेक्षिलेल्या माहितीची मुळ नस्ती अर्हता प्रमाणपत्रे निरिक्षणाकरिता उपलब्ध करुन देण्यात यावी असे सांगितले. त्यानुसार श्री.नितीन मुकणे, उप-अभियंता यांना पत्राने मुळ प्रमाणपत्रे सादर करणेकरिता कळविण्यात आले होते.

वरील वस्तुस्थिती विचारात घेऊन खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

## -: निर्णय :-

१) जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) यांनी आस्थापना विभागात उपलब्ध असलेल्या मुळ नस्तीमध्ये अपिलार्थी अर्जदाराने अपेक्षिलेल्या माहितीची मुळ कागदपत्रे उपलब्ध नसल्यास संबंधितास पुनश्च: पत्र देऊन ५ दिवसांत माहिती प्राप्त करुन घ्यावी.

२) प्राप्त झालेल्या माहितीचे निरिक्षण करण्यासाठी अपिलार्थी अर्जदारास कार्यालयीन वेळेत बोलाविण्यात यावे. निरिक्षणा अंती जी माहिती अपिलार्थी अर्जदारास हवी आहे ती मुद्देनिहाय माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये सही व दिनांक, संबंधीत जनमाहिती अधिकाऱ्याचे तसेच सार्वजनिक प्राधिकरणाचे नाव (ठसा) यांचे सहित जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) यांनी अपिलार्थी अर्जदारास १० दिवसांत उपलब्ध करुन देण्यात यावी. वरील निर्देश देऊन अपिल निकाली काढण्यात आले.

३) सदर आदेशाविरुध्द अपील करावयाचे असल्यास मा.राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, कोकण खंडपीठ, ५ वा मजला, दालन क्र.५२८, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ यांच्याकडे सदर आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत अपील दाखल करता येईल.

(विजयकुमार म्हसाळ)
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (आस्थापना)
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति:-

१) श्री.सोहेल मु. खान,
बी/४०६, विणा सोसायटी, टेंबा रोड,
भाईंदर (प.) ४०११०१.

२) जन माहिती अधिकारी तथा
आस्थापना अधिक्षक (आस्थापना)

३) माहिती अधिकार अपिल नस्ती
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (आस्थापना) यांचे कार्यालय.